# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2015-2017

YEAR : 41) 1st March 2016 ( No. of Pages 08 ) ( No : 04


MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)

# मा. उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने दिनांक २३ डिसेंबर, २०१५ रोजी नेट-सेट प्रकरणी दिलेला निर्णय

## महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या रविवार, दिनांक ७ फेब्रुवारी, २०१६ रोजी झालेल्या बैठकीत संमत करण्यात आलेला ठराव

**एक :** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक ७ फेब्रुवारी, २०१६ रोजी झालेल्या बैठकीमध्ये मा. उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने दिनांक २३ डिसेंबर, २०१५ रोजी नेट-सेटमुक्त शिक्षकांच्या बाबतीत सन २०१३ च्या याचिका क्रमांक २०८२ मध्ये जो निर्णय दिलेला आहे (यापुढे या ठरावात "मा. खंडपीठाचा निर्णय" असा उल्लेख) तो निर्णय तपशीलवारपणे विचारात घेण्यात आला. निरनिराळ्या ९१ परिच्छेदांमध्ये समाविष्ट असलेल्या या निर्णयाचे काळजीपूर्वक अवलोकन केल्यानंतर कार्यकारी मंडळाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतले :-

**(१)** मा. खंडपीठाने अनेक बाबतीत कागदोपत्री त्यांच्या समोर ठेवण्यात आलेली वस्तुस्थिती विचारात घेतली नाही असे दिसून येते. उदा.

"The Universities never stated that Regulations are not binding." (See Para 86 of the Judgment)

(a) या बाबतीत वस्तुस्थिती अशी आहे की, बहुतेक विद्यापीठांच्या कुलगुरुंनी किंवा कुलसचिवांनी १९९१-९९ या काळात नेट-सेट हे सक्तीचे करण्यात आलेले नव्हते, याबाबतची वस्तुस्थिती वेळोवेळी कागदोपत्री नमूद केलेली असून, ती सर्व कागदपत्रे मा.खंडपीठाच्या पुढे ठेवण्यात आलेली आहेत.

(b) खुद्द राज्याच्या मा. उच्चशिक्षण मंत्र्यांनी १९९१-९९ या काळात महाराष्ट्रात नेट-सेट सक्तीचे करण्यात आलेले नव्हते असे विधानपरिषद सभागृहामध्ये नमूद केल्याची अधिकृत कागदपत्रे मा. खंडपीठापुढे सादर करण्यात आलेली होती.

(c) खुद्द विद्यापीठ अनुदान आयोगाने देखील १९९१ ते २००० या काळात महाराष्ट्रामध्ये नेट-सेटचा नियम अंमलात आणला गेला नव्हता हे मा. औरंगाबाद खंडपीठासमोर शपथपत्र दाखल करून सादर केले होते. त्या मा. खंडपीठाच्या निर्णयात तसा स्पष्ट उल्लेख आहे. ही बाब मा. खंडपीठाच्या लक्षात आणण्यात आली होती. पण त्याकडे दुर्लक्ष करण्यात आलेले आहे असे दिसून येते.

(d) **या बाबी विशेष अनुमती याचिकेच्या (SLP) माध्यमातून मा. सर्वोच्च न्यायालयाच्या लक्षात आणून देणे आवश्यक आहे असे या कार्यकारी मंडळाला वाटते.**

**(२)** मा.सर्वोच्च न्यायालयाने राजसिंग प्रकरणी अनेक दिवसांच्या तपशीलवार सुनावणीनंतर १९९१ च्या रेग्युलेशनच्या बाबतीत त्या रेग्युलेशनचे स्वरूप स्पष्ट करणारा जो तपशीलवार निर्णय दिलेला आहे, त्यामध्ये स्पष्टपणे हे रेग्युलेशन शिफारशींच्या स्वरूपाचे आहे असे नमूद केलेले असतांना मा. खंडपीठाने मात्र पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढला आहे :-

"We are not willing to accept the submissions so made by the learned counsel appearing for the Petitioners that 1991 Regulations of UGC are not mandatory referring to cases of *Raj Singh, Beena Inamdar and Jagdish Prasad (supra).* (See Para 48 of the Judgment)"

**ही बाब विशेष अनुमती याचिकेच्या (SLP) माध्यमातून मा. सर्वोच्च न्यायालयाच्या लक्षात आणून देणे आवश्यक आहे असे या कार्यकारी मंडळाला वाटते.**

**(३)** अनेक ठिकाणी मा. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट शब्दात काढलेले निष्कर्ष मा. खंडपीठाने त्यात आपल्या स्तरावर दुरुस्त्या करून वापरले असे दिसून येते. उदा.

(a) मा. सर्वोच्च न्यायालयाचा पुढील निर्णय मा. खंडपीठाने आपल्या निर्णयात उधृत केलेला आहे:-

"It not only would not forfeit its grant but the appointment made without obtaining the UGC's prior approval would stand regularised." Apex Court quoted by High Court (See Para 33 of the Judgment)

(b) मात्र मा. खंडपीठाने निर्णय देतांना पुढीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे :-

"Once the approval is granted, the appointments made even without obtaining the UGC's prior approval, would stand regularised **but for limited purpose.**" (See Para 34 of the Judgment)

## Nagpur University Teachers' Association

**MEETING NOTICE : 1**

**DATED : 01.03.2016**

From :
**Dr. A.W.DHAGE**
Secretary, NUTA Sankalp Sahaniwas,
Khare Town, Dharampeth,
Nagpur-444 010
To,
All the members
of the Nagpur University Teachers' Association
Dear members,

I have the honour to inform you that the General Body meeting of the Nagpur University Teachers' Association will be held at 12.00 noon, on the Day and the Date mentioned below.

2. If you propose to move any resolution for the consideration of the General Body, you are requested to send such resolution to me, with a copy to Prof. P.B. Raghuwanshi, President NUTA, Buty Plot, Near Mahajan wadi, Rajapeth, Amravati 444 601 within a period of 10 days from the date of the posting of this Bulletin.

3. It will not be possible to include in the agenda, resolutions received after the due date. So please make it convenient to send such resolutions, if any, within the stipulated time. The place of the meeting will be intimated to you alongwith the agenda.

Thanking you.

Yours faithfully
**Sd/- Dr.A.W.DHAGE,**
Secretary, NUTA.

***Time, Day and Date of the Meeting 12.00 Noon on Sunday, the 15th May, 2016***

मा. खंडपीठाच्या निर्णयामध्ये वापरण्यात आलेली **"but for limited purpose"** ही शब्दरचना सर्वोच्च न्यायालयाच्या शब्दरचनेचा मूळ अर्थ बदलवून टाकणारी दुरुस्ती होय असे म्हणता येईल. **ही बाब विशेष अनुमती याचिकेच्या (SLP) माध्यमातून मा. सर्वोच्च न्यायालयाच्या लक्षात आणून देणे आवश्यक आहे असे या कार्यकारी मंडळाला वाटते.**

(४) मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला "This Regulation is made under the provisions of Section 26(1) (e) which defines the qualification that are "ordinarily" and not "invariably" required of a lecturer." (See Para 33 of the Judgment) हा मुळात मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आहे. तो तसा परिच्छेद ३३ मध्ये मा. खंडपीठाने उधृत केलेला आहे. मात्र त्यानंतर "These provisions cannot be read in isolation." (See Para 33 of the Judgment) अशी त्यामध्ये दुरुस्ती करून सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अर्थच बदलवून टाकला आहे. **ही बाब विशेष अनुमती याचिकेच्या (SLP) माध्यमातून मा. सर्वोच्च न्यायालयाच्या लक्षात आणून देणे आवश्यक आहे असे या कार्यकारी मंडळाला वाटते.**

(५) केंद्र शासनाने या वादात प्रथमच शपथपत्र दाखल केले असे नमूद करून त्याबाबतीत मा.खंडपीठाने पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविला आहे :-

"It is submitted that no such affidavit was filed by the Union of India at earlier point of time opposing the contentions of the Petitioners including the action of UGC of granting stated relaxation from the qualification of NET/SET requirement. Union of India has opposed the grant of prayers in the Petitions of non NET/SET lecturers." (See Para 13 of the Judgment) याबाबत वस्तुस्थिती अशी आहे की केंद्र शासनाचे शपथपत्र काळजीपूर्वक वाचल्यास याचिकाकर्त्यांच्या ते विरोधात आहे ही गोष्ट वस्तुस्थितीवर आधारित दिसत नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाने घेतलेला ८ जुलै, २०११ च्या ठरावाचे व त्यानंतरच्या कृतीचे केंद्रशासनाने ठामपणे समर्थन केलेले आहे. **या संदर्भात पुढील बाबी विशेष अनुमती याचिकेच्या (SLP) माध्यमातून मा.सर्वोच्च न्यायालयाच्या लक्षात आणून देणे आवश्यक आहे असे या कार्यकारी मंडळाला वाटते.**

(A) केंद्रशासनाच्या वतीने मा.खंडपीठापुढे दिनांक २५ नोव्हेंबर, २०१५ रोजी जे शपथपत्र दाखल करण्यात आलेले आहे, ते मुळात 'बेस्टा' (BESTA) ने दाखल केलेल्या सन २०१३ च्या याचिका क्रमांक १०१६६ च्या संदर्भात दाखल केलेले 'काऊंटर ॲफेडेव्हिट' आहे. 'बेस्टा' (BESTA) ने दाखल केलेल्या याचिकेमध्ये परिच्छेद ३८ च्या उपपरिच्छेद २७ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने अनेक प्रकरणी सरसकट एक्झम्शन दिल्याबद्दल केंद्रशासनाने चिंता व्यक्त केलेली आहे, असे 'बेस्टा' (BESTA) ने आरोपीत केले होते. ते पुढील शब्दात :-

"27. The Petitioners submit that the general exemption, which has been granted by the UGC has been a subject matter of a serious concern, by the Central Government."

याला उत्तर देतांना केंद्रशासनाच्या २५ नोव्हेंबर, २०१५ च्या शपथपत्राच्या परिच्छेद ७ मध्ये केंद्रशासनाने आपली भूमिका नमूद केलेली आहे. ती भूमिका नमूद करीत असतांना या प्रश्नाच्या बाबतीत केंद्रशासनाच्या मानव संसाधन मंत्रालयामध्ये तपशीलवार विचार करण्यात आला असून त्यावर मंत्रालयाने घेतलेल्या निर्णयाची मंत्रालयाच्या फाईल क्रमांक 6-5/2011-U1A मध्ये नोंद करण्यात आलेली असून तो निर्णय शब्दशः या शपथपत्राच्या परिच्छेद ७ मध्ये सुरुवातीलाच नमूद केलेला आहे. हा निर्णय एकूण तीन वाक्यांचा असून ती तीन वाक्ये शब्दशः पुढीलप्रमाणे :-

(1) "The proposal is regarding exemption from NET for appointments of the Post of Lecturers during the period 19.9.91 to 3.4.2000.

(2) In this regard, it is mentioned that the NET is compulsory for appointment to the post of Lecturers in Universities/Colleges **as per latest UGC Regulation, 2009.**

(3) **The regulations are prospective in nature and not retrospective** as intimated to UGC vide letter dated 3.11.2010. Clarification issued in this regard may be seen at page 11/cor."

(B) याच ७ व्या परिच्छेदामध्ये पुढे "The above clarification was issued vide D.O. No.8-7/2010-U.1A dated 3rd November, 2010 from Shri Sunil Kumar, Additional Secretary (HE) to Dr.N.A.Kazmi, Secretary-in-charge, University Grants Commission as under : " असे नमूद करून तो संपूर्ण निर्णय केंद्रशासनाने विद्यापीठ अनुदान आयोगाला कळविला आहे. त्यात सुद्धा स्पष्टपणे "Therefore, exempting the candidates from NET/SLET requirement, **who are going to be appointed or have been appointed after 11th July, 2009, would be violate of the UGC (Minimum qualifications required for the appointment and Career Advancement of teachers** for Universities and institutions affiliated to it (3rd amendment) **Regulations, 2009."** असे म्हटलेले आहे व त्याच शपथपत्रामध्ये "Similarly, since by Commissions' own admission, **the regulations are prospective in nature and not retrospective,** invoking the provision to UGC (Minimum qualifications required for the appointment and Career Advancement of teachers for universities and institutions affiliated to it) Regulations, 2000 is clearly incongruous." असेही कळविले आहे.

(C) याच शपथपत्राच्या परिच्छेद १५ मध्ये 'बेस्टा' (BESTA) च्या याचिकेतील परिच्छेद ६४ ते ६७ ला उत्तर देण्यात आलेले आहे. तो संपूर्ण परिच्छेद १५ शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"15. With reference to the Paragraph no. (64) to (67) the UGC was also on 9th October, 2014 requested to examine the judgment dated 17th October, 2013 of Bombay High Court in the W.P.No.10149 of 2010 (Dr.Mahesh, Son of Prabhakar Kulthe Vs. Union of India, UGC & Ors). It was mentioned that the matter was linked to the applicability of the UGC (Minimum Qualification) Regulation, 1991 and letter No.F.1-1/2002 (PS) Exemp. Dated 16th August, 2013. A copy of the letter dated 9th October, 2014 is annexed hereto and marked as Exhibit "1".

(D) वरप्रमाणे उत्तर देऊन सहपत्र "१" या शपथपत्राच्या सोबत जोडलेले आहे. हे सहपत्र "१" म्हणजे केंद्रशासनाच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाने विद्यापीठ अनुदान आयोगाला पाठविलेले दिनांक ९ ऑक्टोबर, २०१४ रोजीचे पत्र होय. या पत्रामध्ये सरळसरळ विद्यापीठ अनुदान आयोगाला केंद्रशासनाने असे कळविले आहे की, महेश कुलथे विरुद्ध विद्यापीठ अनुदान आयोग व इतर या २०१० च्या याचिका क्रमांक १०१४९ मध्ये मा.औरंगाबाद खंडपीठाचा दिनांक १७ ऑक्टोबर, २०१३ रोजी निर्णय झालेला आहे. **"हा निर्णय मुख्यत्वे १९९१ च्या रेग्युलेशन बाबतचा असून विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक १६ ऑगस्ट, २०११ रोजी महाराष्ट्र शासनाला पाठविलेल्या आदेशाची संबंधित आहे."** न्यायालयाचा हा निर्णय ताबडतोबीने लक्षात घेऊन यथोचित कार्यवाही करण्याबद्दल वेळोवेळी आम्ही विद्यापीठ अनुदान आयोगाला कळविले होते. पण त्यावर विद्यापीठ अनुदान आयोगाने कोणतेच उत्तर दिले नाही असेही या पत्राच्या पहिल्याच परिच्छेदात नमूद करण्यात आलेले आहे. ते शब्दशः पुढीलप्रमाणे:-

"Please refer to my D.O. letter of even No. dated 21st April, 2014 drawing your attention to the Judgment dated 17th October, 2013 of Bombay High Court in the W.P.No.10149 of 2010 (Dr.Mahesh, S/o Prabhakar Kulthe Vs UOI, UGC & Ors) (Copy enclosed). The matter is extremely important and is **linked to the applicability of UGC (Minimum Qualification) Regulation, 1991 and letter No.F.1-1/2002 (PS) Exemp. Pt. dated 16th August, 2011 addressed to the Principal Secretary,** (Higher and Technical Department) Government of Maharashtra. The UGC was requested to examine the judgment urgently and take necessary action apprising the Ministry of the action taken by it from time to time in the matter. No reply, however, has been received from the UGC."

(E) दिनांक ९ ऑक्टोबर, २०१४ च्या याच पत्रामध्ये केंद्रशासनाने विद्यापीठ अनुदान आयोगाला असेही कळविले होते की, या प्रकरणामध्ये काही याचिकाकर्त्यांनी अवमान याचिका दाखल केलेल्या असून त्यामध्ये केंद्रशासन व विद्यापीठ अनुदान आयोग हे प्रतिवादी आहेत. म्हणून ताबडतोबीने याबाबत अवमान याचिकेच्या संदर्भात भूमिका स्पष्ट करणे आवश्यक आहे असे परिच्छेद २ मध्ये नमूद करण्यात आले होते. ते शब्दश पुढीलप्रमाणे :-

"2. Some of the Petitioners have filed a Contempt Petition against the Respondent in the above mentioned Writ Petition. The Respondents include the UOI and UGC. It is, therefore, urgently required to respond to the Contempt Petition."

(F) आमच्या पातळी वरील कागदपत्रांची आम्ही तपासणी केली असता आम्हाला असे आढळून आले आहे की, विद्यापीठ अनुदान आयोगाने या प्रकरणात दिनांक ११ एप्रिल, २०११ रोजी प्रत्युत्तर शपथपत्र (Counter Affidavit) दाखल केलेले आहे, पण त्या शपथपत्रामध्ये दिनांक ८ जुलै, २०११ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाने घेतलेला निर्णय व त्यानंतर दिनांक १६ ऑगस्ट, २०११ चे आदेश व त्यानंतरच्या घटना त्या शपथपत्रात दाखल करण्यात आलेल्या नाहीत. दिनांक ८ जुलै, २०११ च्या नंतरचा हा सारा घटनाक्रम या प्रकरणाशी

निगडित असतांनासुद्धा तो शपथपत्रात नमूद करण्यात आलेला नाही असे परिच्छेद ३ अन्वये कळविले. ते पुढीलप्रमाणे :-

"3. It is observed from available records that a counter Affidavit was filed in the above mentioned Writ Petition by the UGC on 11th April, 2011. This counter Affidavit does not cover the subsequent actions dated 8.7.2011 and 16.8.2011 of the UGC that are relevant in the matter."

इतकेच नव्हेतर केंद्रशासनाने ७ दिवसाच्या आत ८ जुलै, २०११ नंतरचा घटनाक्रम शपथपत्र दाखल करून मा.खंडपीठापुढे ठेवावा असे स्पष्ट आदेश या पत्राच्या परिच्छेद ४ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाला पुढील शब्दात दिलेले आहे :-

"4. I shall be grateful if you arrange to file a comprehensive **reply to the Contempt Petitions covering the above mentioned subsequent actions by the UGC before** the Hon'ble Court, **within Seven days, under intimation to this end."**

(G) दिनांक ९ ऑक्टोबर, २०१४ च्या या पत्रानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाने अवमान याचिकेमध्ये आपले म्हणणे मांडले. मा.औरंगाबाद खंडपीठामध्ये शेख महम्मद अताऊल्ला खुर्दतुल्ला व इतर विरुद्ध संजयकुमार व इतर या प्रकरणी सन २०१४ च्या अवमान याचिका क्रमांक ४३६ मध्ये दिनांक ७ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या खंडपीठाच्या आदेशात विद्यापीठ अनुदान आयोगाने घेतलेली भूमिका नमूद केलेली आहे. ती पुढील शब्दात :-

" PER COURT : 1. Mr. Sharma, the learned counsel for UGC states that for those who have been appointed between September, 1991 till April, 2000, their appointment has been approved and issue of regularization of service as Lectures is now within the domain of the State and the UGC has no role to play in it."

(H) आयोगाच्या ८ जुलै, २०११ च्या निर्णयाला व त्यानंतरच्या त्याबाबतच्या घटनाक्रमाला केंद्रशासनाचा ठाम पाठिंबा होता हे यावरून दिसून येते. मुळात दिनांक ३ नोव्हेंबर, २०११ चे केंद्रशासनाचे हे पत्र *(P6 NB 2011)* विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यांच्या दिनांक १२ ऑगस्ट, २०१० च्या बैठकीमध्ये *(P10 NB 2011)* विषय क्रमांक २.०८ अन्वये मंजूर केलेल्या आयोगाच्या एका ठरावान्वये केंद्रशासनाला केलेल्या विनंतीला देण्यात आलेले उत्तर होते. विद्यापीठ अनुदान आयोगाने "सन २००९ व २०१० च्या रेग्युलेशनने नेट-सेट सक्तीचे केल्यावरसुद्धा जुन्या काही प्रकरणामध्ये एक्झमशन देण्याचा आमचा अधिकार कायम रहावा" असा ठराव *(P10 NB 2011)* केला होता व त्या ठरावाच्या शेवटी असे नमूद केले होते की :-

"The Commission further decided that this may be sent to the Government of India for their concurrence in view of earlier Order No. F.5-4/2005-U.I (A) dated 30th March, 2010 issued under Section 20(1) of the UGC Act, 1956." *(P10 NB 2011)*

(I) आयोगाच्या त्या ठरावाबाबत केंद्रशासनाने दिनांक ३ नोव्हेंबर, २०११ रोजी आयोगाला पत्र *(P6 NB 2011)* पाठविले. त्या पत्रातील सुरुवातीचा मजकूर पुढीलप्रमाणे :-

"Dear Dr. Kazami

I desire to draw your attention to your letter addressed to the Secretary, HE dated 23rd September, 2010 In which a request has been made to the Government to accord concurrence to the resolution made by the commission on agenda Item no. 2.08 in its 471st meeting held on 12.08.2010.

In this connection, I am desired to convey to you that said resolutions are against the letter and spirit of the regulations issued by UGC from time to time **regarding compulsory NET/SLET qualifications** for appointment to lecturers/Asst. Professors. The above mentioned resolution perhaps does not take into account the fact that appointments, If any, pursuant to the date of coming into force of **these regulations are bound to be prospective only. Appointments can never be made with retrospective dates. Therefore, exempting the candidates from NET/SLET requirement, who are going to be appointed or have been appointed after 11th July, 2009 would be violative of the UGC** (Minimum qualifications required for the appointment and career Advancement of teachers for Universities and institutions to it) (3rd amendment) **Regulation,** 2009."

(J) उपरोक्त साऱ्या खटाटोपानंतर नागपूर खंडपीठाच्या निर्णयामुळे CAS साठी सेवा कोणत्या तारखेपासून धरावी याबाबतचा निर्णय दिनांक ८ जुलै, २०११ च्या बैठकीत आयोगाला घ्यावा लागला. त्याची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे:-

(1) The Commission **deliberated** on the issue regarding appointment of various teachers in the State of Maharashtra from **September 19, 1991 until April 3, 2000 and**

(2) resolved that all such appointments made on regular basis by various universities in the state of Maharashtra where the **university has granted exemption** to teachers from the requirement of NET in terms of the UGC Regulations, 1991 and subsequent Notification dated 24th December, 1998 and

(3) where the **representation** has been forwarded to Commission seeking further approval in relation to such regular appointments made during the said period w.e.f. September 19,1991 till April 3, 2000 **is approved.**

सन १९९१ च्या रेग्युलेशन प्रमाणे १९९१ ते १९९९ या काळात Exemption/ Relaxation देण्याचा अधिकार त्या त्या विद्यापीठांनाच होता हे लक्षात घेतले पाहिजे. मात्र त्याला आयोगाची मान्यता हवी होती. ती आयोगाने दिली.

दिनांक ८ जुलै, २०११ चा हा निर्णय व त्यानंतरच्या घटनाक्रमाला केंद्रशासनाचा पूर्ण पाठिंबा होता हे स्पष्ट करणारे दिनांक ९ ऑक्टोबर, २०१४ चे पत्र केंद्रशासनाने शपथपत्रासोबत खंडपीठासमोर सादर केले होते. "मानव संसाधन विभागाचे संचालक श्री.आर.डी.सहाय हेही त्या बैठकीला उपस्थित होते" असा आयोगाच्या ८ जुलै, २०११ च्या बैठकीच्या कार्यवृत्तात *(P75 NB 2011)* उल्लेख आहे.

**(६)** पेन्शन व ग्रॅच्युईटी च्या संदर्भात आपल्या निर्णयाच्या परिच्छेद ३७ मध्ये मा. खंडपीठाने पुढीलप्रमाणे नमूद केलेले आहे :-

"PENSION AND GRATUITY : There is no issue that non NET/SET teachers, inspite of no requisite qualification of NET/SET have been getting pay Commission's scale, HRA, Leave Travel Allowance, DA,TA and all other related benefits, including increments and pension and gratuity." (See Para 37 of the Judgment)

मात्र याच निर्णयाच्या परिच्छेद ९१ (३) मध्ये पुढीलप्रमाणे त्या विरोधात आदेशित केलेले आहे :-

"The challenge to the validity of the impugned State Government Resolution dated 27 June 2013 is rejected. The action of the State of Maharashtra is upheld." (See Para 91 (3) of the Judgment)

**ही बाब विशेष अनुमती याचिकेच्या (SLP) माध्यमातून मा. सर्वोच्च न्यायालयाच्या लक्षात आणून देणे आवश्यक आहे असे या कार्यकारी मंडळाला वाटते.**

(७) आपल्या निर्णयाच्या परिच्छेद ३९ मध्ये मा. खंडपीठाने पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविला आहे:-

"Therefore, the submission that UGC Regulations do not become automatically binding on the State Government or the Universities is also incorrect." (See Para 39 of the Judgment) त्याचबरोबर अशाच प्रकारचा निष्कर्ष परिच्छेद ४२ मध्ये पुढीलप्रमाणे नमूद आहे :-

"The submission of the learned counsel appearing for the Petitioners who have not acquired the NET/SET qualification that the UGC Regulations dated 19.9.1991 are binding only if adopted by the State and/or Universities and/or not automatically binding is incorrect and unacceptable." (See Para 42 of the Judgment)

हे दोनही निष्कर्ष मा. सर्वोच्च न्यायालयाच्या राजसिंग प्रकरणातील निर्णयाच्या विरोधात आहे. **ही बाब विशेष अनुमती याचिकेच्या (SLP) माध्यमातून मा. सर्वोच्च न्यायालयाच्या लक्षात आणून देणे आवश्यक आहे असे या कार्यकारी मंडळाला वाटते.**

(८) टिकाराम देवाजी कोसे या प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिलेला निर्णय व त्याच उच्च न्यायालयात शासनाने दाखल केलेले शपथपत्रही मा. खंडपीठासमोर याचिकाकर्त्यांनी दाखल केलेले होते. त्याबाबत मा. खंडपीठाने

"A Division Bench judgment dated 20.04.2011 in Writ Petition No.4909 of 2010 Tikaram Dewaji Kose and ors v. State of Maharashtra and ors., (Nagpur Bench) directed the

UGC to communicate to the State Government the date when such relaxation/exemption become effective. **Accordingly it was provided."** (See Para 62 of the Judgment) ही याचिका मुळात ०५.११.२००८ च्या आदेशान्वये देण्यात आलेले एक्झमशन CAS साठी कोणत्या तारखेपासून लागू होईल. ते आयोगाने स्पष्टपणे कळवावे यासाठी करण्यात आलेली होती व शेवटच्या परिच्छेदात मा.नागपूर खंडपीठाने CAS करिता केव्हापासून ते लागू होईल ते कळविण्याचे आदेश आयोगाला दिलेले होते, पण त्याकडे मा. खंडपीठाने "Accordingly it was provided" असे नमूद करून मुळबाबीकडे दुर्लक्ष केलेले आहे. **ही बाब विशेष अनुमती याचिकेच्या (SLP) माध्यमातून मा. सर्वोच्च न्यायालयाच्या लक्षात आणून देणे आवश्यक आहे असे या कार्यकारी मंडळाला वाटते.**

**(९)** कोसे यांच्याच प्रकरणात राज्यशासनाने दाखल केलेल्या शपथपत्राबाबत पुढीलप्रमाणे निष्कर्ष नमूद केलेला आहे :-

"The State's earlier affidavit, where willingness was expressed to provide CAS benefits, after stated relaxation by the UGC, even if any, in view of the policy decision so taken,being empowered to do so and now issued the impugned Resolution/circular by giving restricted benefits, subject to conditions, in our view, is just and proper." (See Para 64 of the Judgment)

खुद्द न्यायालयामध्ये शपथपत्र दाखल करून विद्यापीठ अनुदान आयोगाने कळविले त्या तारखेपासून CAS चे लाभ देण्यात येतील असे शासनाने नमूद केले होते. त्याकडे पूर्ण दुर्लक्ष करून मा. खंडपीठाने "giving restricted benefits, subject to conditions, in our view, is just and proper" असा निष्कर्ष नोंदविला आहे. **ही बाब विशेष अनुमती याचिकेच्या (SLP) माध्यमातून मा. सर्वोच्च न्यायालयाच्या लक्षात आणून देणे आवश्यक आहे असे या कार्यकारी मंडळाला वाटते.**

**(१०)** विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्गमित केलेले १६ ऑगस्ट, २०११ चे आदेश व त्याच बरोबर २६ ऑगस्ट, २०११ चे आदेश रद्दबादल ठरविण्याविषयीची मागणी मा. खंडपीठाने आपल्या निर्णयाच्या परिच्छेद ८५ मध्ये पुढील शब्दात फेटाळून लावली आहे :-

"The challenge to letters 16.08.2011 and 26.08.2011 is also disposed off for above reasons." (See Para 85 of the Judgment)

मात्र असे करीत असतांना २६ ऑगस्ट, २०११ च्या आदेशातील “सर्व प्रयोजनासाठी नेमणूकीच्या दिवसापासून सेवा धरावी” या भागाकडे दुर्लक्ष केलेले आहे. **ही बाब विशेष अनुमती याचिकेच्या (SLP) माध्यमातून मा. सर्वोच्च न्यायालयाच्या लक्षात आणून देणे आवश्यक आहे असे या कार्यकारी मंडळाला वाटते.**

**(११)** नेट-सेटची पात्रता कायद्याने व नियमाने सक्तीची करण्यात आली होती किंवा नाही हे तपासून पाहण्याची बाब मा. खंडपीठाने फेटाळून लावली असून ज्याअर्थी अनेक लोक या पात्रता परीक्षेला बसत होते. त्याअर्थी ती पात्रता सक्तीची होती, असा निष्कर्ष मा.खंडपीठाने पुढील शब्दात काढलेला आहे :-

"We are not inclined to accept the contention that there was no provision either in the Statute and/or the Act making NET/SET qualification compulsory. The fact that more than two lac persons/teachers/professions/candidates have already acquired NET/SET even some of them during the period 19.09.1991 to 3.4.2000, itself sufficient to deny the contention of such Petitioners." (See Para 31 of the Judgment)

"The requirement of such teachers to have the qualification, and as in fact many teachers/lecturers have acquired such qualification, that itself is sufficient to reject the contention of the Petitioners to treat the condition and/or requirements of the Regulations being recommendatory. The UGC Regulations dated 4.4.2000 cannot be used and utilised by the Petitioners to say that NET/SET qualification requirement held to be mandatory, subsequently." (See Para 25 of the Judgment)

कायद्याने किंवा नियमाने नेट-सेटची पात्रता सक्तीची केलेली नाही हे नमूद करणाऱ्या सर्व कागदपत्रांकडे मा. खंडपीठाने दुर्लक्ष केले असून बाहेर अनेक लोक अशी पात्रता मिळविण्यासाठी प्रयत्न करीत होते, त्याअर्थी ती पात्रता सक्तीची होती असा काढलेला निष्कर्ष याचिकाकर्त्यांवर अन्याय करणारा आहे. **ही बाब विशेष अनुमती याचिकेच्या (SLP) माध्यमातून मा. सर्वोच्च न्यायालयाच्या लक्षात आणून देणे आवश्यक आहे असे या कार्यकारी मंडळाला वाटते.**

आपल्या निर्णयाच्या परिच्छेद २४ मध्ये मा. खंडपीठाने पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविला आहे:-

"If there was no such requirement and/or insistence, there was no question of these candidates to acquire and or to proceed to acquire the qualification." (See Para 24 of the Judgment) ज्याअर्थी बाहेर अनेक लोक नेट-सेट करीत होते त्याअर्थी नेट-सेट सक्तीचे होते असा निष्कर्ष अचंबित करणारा आहे. कायद्यात/नियमात किंवा परिनियमात ते सक्तीचे करण्यात आले होते किंवा हे मा. खंडपीठाने न पाहिल्यामुळे याचिकाकर्त्यांवर अन्याय झालेला आहे. **ही बाब विशेष अनुमती याचिकेच्या (SLP) माध्यमातून मा. सर्वोच्च न्यायालयाच्या लक्षात आणून देणे आवश्यक आहे असे या कार्यकारी मंडळाला वाटते.**

**(१२)** मा. खंडपीठाने सर्वोच्च न्यायालयाच्या शरदेंदू भूषण या प्रकरणातील "Experience is the basis of placement" या निर्णयाकडे मा.खंडपीठाने पूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे.

"Merely because the counting of past service is necessary as per UGC Regulations, the State policy to regularise such services from the date of resolution, cannot be used against the State for CAS claim." (See Para 69 of the Judgment) CAS साठी Adhoc सेवा सुद्धा धरावी असा विद्यापीठ अनुदान आयोगाचा व महाराष्ट्र शासनाचा नियम मा. खंडपीठासमोर ठेवण्यात आला होता, पण त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले. **या बाबी विशेष अनुमती याचिकेच्या (SLP) माध्यमातून मा.सर्वोच्च न्यायालयाच्या लक्षात आणून देणे आवश्यक आहे असे या कार्यकारी मंडळाला वाटते.**

**(१३)** राज्यशासनाला धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार आहे असे परिच्छेद ६९ मध्ये मा. खंडपीठाने पुढील शब्दात नमूद केलेले आहे :-

"Merely because the counting of past service is necessary as per UGC Regulations, the State policy to regularise such services from the date of resolution, cannot be used against the State for CAS claim." (See Para 69 of the Judgment) व राज्यशासनाच्या अशा धोरणात्मक निर्णय घेण्याच्या समर्थनापोटीच परिच्छेद ४१ व ९१ मध्ये पुढील प्रमाणे आदेश पारित केलेले आहेत :-

"In these present matters, the State by the impugned Circular, itself has endorsed the adoption of Regulations in 1992 and therefore, granted benefits accordingly, subject to conditions so mentioned." (See Para 41 of the Judgment)

"(1) **It is declared that the teachers/professors/ lecturers/candidates who have not acquired NET/SET/ TEST qualification and who are appointed during 24.10.1992 to 3.4.2000 (except 19.9.1991 to 23.10.1992) (see Government Resolution dated 27.06.2013) are not entitled for CAS (Career Advancement Scheme)** and other related benefits except the benefits including the pay scale and increments and other related benefits, as announced by the State, but on conditions so reproduced."

असे आदेश पारित करतांना १९.०९.१९९१ ते २३.१०.१९९२ या कालखंडात नेमले गेलेले नेट-सेटमुक्त शिक्षक व २४.१०.१९९२ व ०३.०४.२००० या काळात नेमल्या गेलेले शिक्षक यांच्यामध्ये वैधानिकदृष्ट्या कोणताच फरक नव्हता. सुरुवातीस व शेवटपर्यंत सर्व बाबतीत हे दोनही वर्ग एकाच प्रवर्गाचा भाग होते या गोष्टीकडे मा. खंडपीठाचे दुर्लक्ष झालेले आहे. २३.१०.१९९२ चा राज्यशासनाचा आदेश राज्यशासनाने पुढच्या ३५ दिवसांत दिनांक २७ नोव्हेंबर, १९९२ ला रद्द केला होता. ही बाब मा. खंडपीठाच्या निर्णयाच्या परिच्छेद १६ मध्ये नमूद आहे. याबाबीकडे दुर्लक्ष केल्यामुळे सन १९९१ ते २००० या काळात सर्व अर्थाने एकाच प्रवर्गात असलेल्या या शिक्षकांचे कृत्रिमरित्या असमर्थनीय असे दोन भाग करण्याच्या राज्यशासनाच्या कृतीचे मा. खंडपीठाने समर्थन केले आहे. अशा समर्थनाला कोणताही आधार नाही. **ही बाब विशेष अनुमती याचिकेच्या (SLP) माध्यमातून मा. सर्वोच्च न्यायालयाच्या लक्षात आणून देणे आवश्यक आहे असे या कार्यकारी मंडळाला वाटते.**

**(१४)** विद्यापीठ अनुदान आयोगाने ८ जुलै, २०११ च्या बैठकीत जो ठराव केला, त्या ठरावाप्रमाणे शेकडो शिक्षकांना देण्यात आलेले एक्झमशन CAS च्या प्रयोजनार्थ कोणत्या तारखेपासून लागू होईल हे ठरवून देण्यासाठीच तो ठराव केलेला होता. कारण तसे ठरवून देण्याबाबत नागपूर खंडपीठाचे आदेश होते. असे असतांना मा. खंडपीठाने त्या बाजूकडे दुर्लक्ष केले व जणू काही या सर्व शिक्षकांच्या सेवा धोक्यात आलेल्या होत्या व त्यामुळे त्यांच्या सेवेला संरक्षण देण्यासाठी आयोगाने ८ जुलै, २०११ चा ठराव केला असे मा. खंडपीठाने गृहीत धरले व तसा निष्कर्ष परिच्छेद ७९ मध्ये नमूद केला.

"Resolutions of 8.7.2011 itself was for the protection of services of the lecturers regularly appointed between

19.9.1991 to 3.4.2000. It is for the protection of services only. The aspects of regularising the services of such candidates/ teachers/lecturers in the background so referred above, need no interference. "(See Para 79 of the Judgment)

वस्तुतः हे सर्व शिक्षक सेवेत कन्फर्म झालेले शिक्षक होते. **ही बाब विशेष अनुमती याचिकेच्या (SLP) माध्यमातून मा. सर्वोच्च न्यायालयाच्या लक्षात आणून देणे आवश्यक आहे असे या कार्यकारी मंडळाला वाटते.**

**(१५)** सन १९९१ ते १९९९ या काळातील "सेवेत कन्फर्म झालेल्या शिक्षकांचा वर्ग" एका बाजूला व सन २००१ च्या आदेशान्वये १९९९ च्या शेवटी "काही थोडक्या शिक्षकांना सेवामुक्त करण्यात आले." त्या प्रकरणी सन २००२ मध्ये मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने एक व मुंबई खंडपीठाने एक निर्णय दिला व मोजक्या काळातील व नमूद केलेली मोजकी प्रकरणे विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठवावी व "विद्यापीठ अनुदान आयोगाने याबाबतचा चार महिन्यात निर्णय घ्यावा" असे मा. मुंबई खंडपीठाचे आदेश असतांना एक म्हणजे "सेवामुक्त शिक्षकांची न्यायालयाने नमूद केलेली मोजकी प्रकरणे" पाठवितांना कोणतेही कारण नसतांना, न्यायालयाचे तसे आदेश नसतांना "सेवेत कन्फर्म असलेल्या शिक्षकांची शेकडो प्रकरणे" आयोगाकडे पाठविण्यात आली. दुसरे म्हणजे "चार महिन्यात आयोगाने निर्णय द्यावा" असा मा. खंडपीठाचा निर्णय असतांना आयोगाने १० वर्षे लावलीत. **या बाबी मा.खंडपीठाच्या लक्षात आणून देण्यात आल्या होत्या.** मात्र या दोनही बाबतीत न्यायालयाच्या गंभीर अवमानाच्या या प्रकरणी पुढीलप्रमाणे मत व्यक्त करून मा. खंडपीठाने आयोगाला मोकळे सोडून दिले.

"There was no question to keep the relaxation issues pending for so many years by the UGC, though the appointments were made without any prior relaxation/ approval of requisite qualifications for such period." (See Para 44 of the Judgment)

"The documents and the communication of UGC shows that the relaxation to the posts were granted, after 8 to 15 years from the date of respective dates of appointments so mentioned in the communication by the UGC." (See Para 45 of the Judgment) **ही बाब विशेष अनुमती याचिकेच्या (SLP) माध्यमातून मा. सर्वोच्च न्यायालयाच्या लक्षात आणून देणे आवश्यक आहे असे या कार्यकारी मंडळाला वाटते.**

**(१६)** मा. खंडपीठाने आपल्या निर्णयाच्या परिच्छेद ३७ मध्ये व त्यापूर्वी परिच्छेद २३ व २० मध्ये पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढले आहेत :-

